शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**महोदय/महोदया,**

विद्यार्थी प्रवेश अर्जामध्ये **"निवडणूक मतदार यादीमध्ये नाव नोंदविल्याबाबतच्या माहितीचा समावेष करणेबाबतचे"** मा.विभागीय सहसंचालक (उ.शि.), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे जा.क्र.विससं/उशि/कोवि/विद्यापीठ/२०१७/८९४, दि.०३/०३/२०१७ चे पत्र व सदर पत्रासोबतचे मा.प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.-युएनआय/२०१७/विशि-१/२५५२, दि.०१ मार्च, २०१७ चे पत्र तसेच मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्र.संकीर्ण-२०१६/(प्र.क्र.६८३)/विशि-३, दि.०९/०२/२०१७ चे पत्र सोबत अग्रेषित केले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये,

I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 222
दि. 14 MAR 2017

महाराष्ट्र शासन

विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४

Web : www.jdhekop.org, E-mail: jdhekop@gmail.com,

फोन नं. (०२३१) २५३५४००/२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्रं.विससं/उशि/कोवि/विद्यापीठ/२०१७/894 दि.०३/०३/२०१७

प्रथम प्राधान्याने/अत्यंत महत्वाचे

प्रति,

कुलसचिव,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय - विद्यार्थी प्रवेश अर्जामध्ये निवडणूक मतदार यादीमध्ये नाव नोंदविल्याबाबत माहिती समाविष्ट करणेबाबत . .

संदर्भ - संचालनालयाचे पत्र क्र.युएनआय/२०१७/विशि-१/२५५२ दि.०१.०३.२०१७

संदर्भिय पत्र सोबत जोडले असून त्याचे अवलोकन व्हावे.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, आपल्या विद्यापीठाच्या प्रवेश अर्जामध्ये आपण मतदार यादीमध्ये आपले नांव नोंदविले आहे काय ? अशा प्रकारचा अतिरिक्त तपशील मागणीचा समावेश करुन आठ दिवसाच्या आत शासनास सुधारीत अर्जाचे नमूने सादर करण्याबाबत तसेच परदेशी व परराज्यातील विद्यार्थ्याबाबत निर्माण होणा-या अडचणी तपासून याबाबत व प्रत्येक विद्यार्थ्याला १८ वर्षे पूर्ण ज्या टप्प्यावर पुर्ण होतील तेंव्हा मतदान नोंदणी अनिवार्य करण्याबाबत आपले अभिप्राय शासनास तात्काळ सादर करावेत व त्याची प्रत उलटटपाली या कार्यालयास सादर करण्यात यावी.

सोबत - वरिल प्रमाणे

विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

प्रत - मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीसाठी सविनय सादर




Shivaji University Kolhapur
Affiliation 1-2
Inward No. 6292
Date 06/03/17

महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय,(उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,पुणे ४११००१

Web: www.dhepune.gov.in Mail Id: vishi.dhepune@.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स०२०/२६१११११५३

क्र.- युएनआय / २०१७/विशि - १ / २५५२ दि. २८/२/२०१७

1 MAR 2017

प्रति,

१ कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,
२ सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,

**विषय -** विद्यार्थी प्रवेश अर्जामध्ये निवडणूक मतदार यादीमध्ये नाव नोंदविल्याबाबत माहिती समाविष्ट करणेबाबत.

**संदर्भ** - १. शासनाचे पत्र क्र सकीर्ण २०१६/ प्र.क्र.६३८ /विशि-३ दि. ९/२/२०१७

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित शासन पत्राचे अवलोकन व्हावे. सोबत प्रत जोडली आहे.

आपल्या विद्यापीठाच्या प्रवेश अर्जामध्ये आपण मतदार यादीमध्ये आपले नाव नोंदविले आहे काय? अशा प्रकारचा अतिरिक्त तपशील मागणीचा समावेश करुन आठ दिवसाच्या आत शासनास सुधारीत अर्जाचे नमूने सादर करण्याबाबत तसेच परदेशी व परराज्यातील विद्यार्थ्याबाबत निर्माण होणा-या अडचणी तपासून याबाबत व प्रत्येक विद्यार्थ्याला १८ वर्षे पूर्ण ज्या टप्प्यावर पुर्ण होतील तेव्हा मतदान नोंदणी अनिवार्य करण्याबाबत आपले अभिप्राय शासनास तात्काळ सादर करावेत व एक प्रत संचालनालयास सादर करण्यात यावी.

(सुयश दुसाने)
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य पुणे, - १

प्रत - १.मा. श्री.सतिश माळी, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०००३२

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०१६/(प्र.क्र.६८३)/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०९/०२/२०१७.

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृष विद्यापीठे.

**विषय:-** विद्यार्थी प्रवेश अर्जामध्ये निवडणूक मतदार यादीमध्ये नाव नोंदविल्याबाबतची माहिती समाविष्ट करणेबाबत.

महोदय,

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व सर्व महाविद्यालयांमध्ये लाखो विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत. उच्च शिक्षणाच्या एका टप्प्यावर सर्व विद्यार्थी हे त्यांच्या वयाची १८ वर्ष पुर्ण करतात.

सदर तरुण मतदारांची अधिकाधिक नाव नोंदणी व्हावी यासाठी राज्य निवडणूक आयोग व राज्य शासनामार्फत नवनवीन उपक्रम हाती घेतले जात आहेत. याचाच एक भाग म्हणजे राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये व सर्व महाविद्यालयांमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जामध्ये "आपण मतदार यादीमध्ये आपले नाव नोंदविले आहे काय ?" या प्रकारचा एक अतिरिक्त तपशीलाची विचारणा करण्याच्या मुद्द्याचा समावेश करण्याचे विचाराधिन आहे.

सबब त्याअनुषंगाने आपल्या-आपल्या विद्यापीठाच्या प्रवेश अर्जामध्ये अशा प्रकारच्या अतिरिक्त तपशील मागणीचा समावेश करुन आठ दिवसाचे आत शासनास अर्जाचे सुधारित नमुने सादर करावेत. तथापी, परदेशी विद्यार्थी अथवा परराज्यातील विद्यार्थ्यांबाबत निर्माण होणारी अडचणदेखील तपासण्यात यावी. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला १८ वर्षे ज्या टप्प्यावर पुर्ण होतील, तेव्हा मतदार नोंदणी अनिवार्य करण्याबाबत आपले अभिप्राय सविस्तर तपशीलसह शासनास तात्काळ सादर करावेत, ही विनंती.

आपला,

(सतिश माळी)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

माहीतीस्तव-

१) मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक

प्रत:-

- आवश्यक कार्यवाहीस्तव :-
  १) संचालक, उच्च शिक्षण पुणे,
  २) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.
  ३) निवड नस्ती